# युवकांसाठी करिअर कट्टा मासिक




करिअर कट्टा हा महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, उज्वल भवितव्यासाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सातत्याने प्रयोगशील असा उपक्रम आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास, कौशल्य विकास, उद्योजकता विकास आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याची संधी मिळते. करिअर कट्टा मासिक ही अत्यंत अभिनव संकल्पना विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे एक साधन ठरले आहे.

'युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी' हे ब्रीदवाक्य असलेला करिअर कट्टा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना त्या बरोबरीने त्यांच्या सर्वच कलागुणांना कायमच महत्व देत असतो. करिअर कट्टा मासिक या उपक्रमामुळे महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यावसायिक जगात टिकणारे आणि यशस्वी व्यावसायिक होऊ शकतात अशा प्रकारच्या संकल्पनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उज्वल भवितव्य निर्माण करण्याची संधी या माध्यमातून मिळणार आहे. येत्या, जून २०२५ पासून करिअर कट्टा मासिक या उपक्रमाचा शुभारंभ झालेला आहे. याचा फायदा केवळ विद्यार्थ्यांना होईल असे नाही तर, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि समन्वयक या सगळ्यांनाच याचा निश्चितच फायदा होईल. सदर मासिक विद्यार्थ्यांच्या वैचारिक क्षमतेत सकारात्मक भर घालणारे ठरेल.

या मासिकाच्या स्वरूपाविषयी सांगताना काही बाबी ठळकपणे नमूद कराव्या वाटतात त्या अशा की, या मासिकामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवरील उद्योग जगतामध्ये घडलेल्या घडामोडींचा वृत्तांत व मराठी उद्योजकांची यशोगाथा त्यांचा संपूर्ण प्रवास थेट अमेरिकेतून अध्यक्ष डॉ. आनंद गाणू यांच्या 'गर्जे मराठी ग्लोबल' यांच्या माध्यमातून अनेक तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना याचा लाभ होत आहे. संपूर्ण महिनाभरामध्ये घडलेल्या घटनांचा स्पर्धा परीक्षेच्या दृष्टिकोनातून घेतलेला चालू घडामोडींचा आढावा मा. श्रीकांत इंगळे मांडत असतात. आंतरराष्ट्रीय लोकसेवा आयोग आणि संघ लोकसेवा आयोग या परीक्षा कशा पद्धतीने यशस्वी केल्यात हे अनुभव आणि सेवेत असताना कार्यनिष्ठा जोपासत उभ्या झालेल्या मा. तुषाबा शिंदे (IRPS इंडियन रेल्वे पर्सोनल, दिल्ली) ह्या जेष्ठ मान्यवरांचे प्रगल्भ मार्गदर्शनपर लेखांचा समावेश या मासिकामध्ये आहे. ज्याचा विद्यार्थ्यांना अनेक पद्धतीने लाभ होत आहे.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टिकोनातून अनेक सर्जनशील उपक्रम महाविद्यालयीन पातळीवर कसे राबविले जावे यासाठी कायम प्रयत्नशील असणारे व्यक्तिमत्व मा. प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे ह्यांचा लेख त्याचप्रमाणे, व्यक्तिमत्व विकासातून करिअरचा राजमार्ग कसा निवडायचा मा. राजीव नंदकर (यशदा) ह्यांचा सखोल अभ्यासपूर्ण लेख या मासिकामध्ये असतो. स्वकर्तुत्वाने उद्योग क्षेत्रात भरारी घेणाऱ्या नवीन उद्योजकांची मुलाखत तर करिअर कट्टाच्या माध्यमातून तरुणांनी संपादित

केलेल यश यावर आधारित लेखही असतात. प्रत्येक महिन्यामध्ये निघालेल्या शासकीय नोकरीच्या जाहिराती व खाजगी क्षेत्रातील रोजगाराच्या संधी याबाबत माहितीपूर्ण लेख असतात. देशाच्या प्रशासनामध्ये कार्यरत असणाऱ्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांची निमंत्रित संपादक म्हणून लेख आहेत. त्याचप्रमाणे, आंतरराष्ट्रीय घडामोडी व सुरक्षा धोरण संशोधन यावर आधारित ज्येष्ठ विचारवंत संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र शासन सन्माननीय डॉ. शैलेंद्र देवळाणकर ह्यांचा अभ्यासपूर्ण लेख या मासिकामध्ये असतो. तसेच, स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना मुलाखतीचे तंत्र यावर आधारित मा. महेश भागवत ह्यांचा माहितीपूर्ण लेख तर संपूर्ण अंकावर आधारित प्रश्न मंजुषा या मासिकामध्ये असते. त्याचप्रमाणे, करिअर संसदेच्या कामाचा लेखाजोखा याची माहिती देणारा सविस्तर लेख असतो.

गेल्या वर्षभरात या मासिकातील सर्वच लेख विद्यार्थ्यांच्या पसंतीस उतरले आहेत. मासिकाबद्दल चांगल्या प्रतिक्रिया ते देत आहेत. डिजीटल व छापील या दोन्ही प्रकारामध्ये ते मासिक वाचतात, वाचून प्रश्नमंजुषा सोडवतात. शिक्षणाची गुणवत्ता आणि कौशल्य विकास उपक्रमांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे हे मासिक ठरले आहे आणि म्हणूनच तरुणाईला ते खऱ्या अर्थाने पथदर्शक ठरले आहे, हा विश्वास वाटतो.

**प्रा. संदेश दशरथ कासार**
सदस्य, राज्यस्तरीय प्रकाशन संपादकीय समिती

★ ★ ★

